## <u>आदेश निशाणी क्र. ३५६</u>

(दिनांक ०७/०७/२०२५)

१. प्रतिवादी क्र. १३ अ ते १३फ यांनी प्रस्तुत अर्ज जादा मुद्दे काढणेकरीता दाखल केला आहे.

२. प्रतिवादी क्र. १३अ ते १३फ यांच्या कथनानुसार, वादी यांनी प्रस्तुतचा दावा, दावा मिळकतीचे सरस निरस धडेवाटप होवून पृथक कब्जा मिळण्याकरीता दाखल केलेला आहे. दावा दाखल करताना वादीने प्रतिवादी क्र. १३ व १४ यांना या दाव्यात पक्षकार केलेले नव्हते तसेच या दाव्यातील अ.क्र. १० येथे नमुद केलेली सर्व्हे नंबर १८४ हि. नं. ५ ही मिळकत या दाव्यात धरलेली नव्हती. त्यानंतर वादीने दावा दुरुस्ती करुन प्रतिवादी क्र. १३ व १४ यांना पक्षकार केले. त्यानंतर त्यांना समन्स पाठविण्यात आले. त्यानंतर प्रतिवादी क्र. १३ व १४ यांनी मे. कोर्टात हजर होवून नि. ६८ कडे आपली कैफियत दाखल केली. सदर कैफियतीमध्ये परिच्छेद क्र. ९ मध्ये सर्व्हे नंबर १८४ हि. नं. ५ ही दावा मिळकत प्रतिवादी क्र. १३ व १४ यांचे वडील कै. गोपाळ कृष्णा रेडकर यांची स्वसंपादित मिळकत आहे असे नमुद केले आहे. प्रतिवादी क्र. १३ व १४ हे मयत झाल्यानंतर प्रतिवादी क्र. १३ चे वारस प्रतिवादी क्र. १३ अ, ब, क, फ यांनी नि. १४९ कडे तसेच प्रतिवादी क्र. १३इ व १३ड यांनी नि. १५५ व १७७ कडे आपली कैफियत दाखल केली आहे व त्यामध्ये सर्व्हे नं. १८४ हि. नं. ५ हि मिळकत प्रतिवादी क्र. १३ व १४ यांचे वडील कै. गोपाळ कृष्णा रेडकर यांची स्वसंपादित मिळकत आहे असे नमुद केले आहे.

३. प्रस्तुत दाव्यात प्रतिवादी क्र. १३ व १४ यांना दाव्यात पक्षकार करण्यापूर्वी तसेच सर्व्हे नं. १८४ हि. नं. ५ हि मिळकत दाव्यात समाविष्ट करण्यापूर्वी मे. कोर्टाने नि. ५१ कडे मुद्दे काढलेले आहेत. त्यानंतर प्रतिवादी क्र. १३ व १४ यांनी आपली कैफियत दाखल केली आहे. सदर कैफियत विचारात घेता खालीलप्रमाणे मुद्दा काढण्यात यावा अशी विनंती प्रतिवादी क्र. १३अ ते १३ फ यांनी केली आहे.

‘’ Do the Defendants no. 13A to 13F and 14 prove that property described at Sr. No. 10 Survey no. 184 Hissa no. 5 is Self Acquired property of the defendants no. 13 and father of defendant no. 14 ?

४. वादी यांनी सदर अर्जावर आपले म्हणणे नि. ३५७ वर दाखल करुन अर्जास विरोध केला आहे. प्रतिवादीच्या कथनानुसार वादीचा अर्ज प्रतिवादीस मान्य व कबुल नाही. अर्जातील मोघम विधानांवर विसंबुन मे. कोर्टास प्रतिवादी मागणी करतात त्याप्रमाणे नवीन मुद्दा काढणेची कोणतीही गरज नाही. प्रतिवादी यांनी प्रस्तुतचा अर्ज हा दाव्याचा न्यायनिर्णय होणेस विलंब होण्यासाठी दाखल केला आहे. सबब अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

५. अभिलेखाचे अवलोकन केले तसेच दोनही बाजूचा युक्तीवाद ऐकला.

६. वादीने प्रस्तुत दावा, दावा मिळकतीचे सरस निरस धडेवाटप होवून पृथक कब्जा मिळण्याकरीता दाखल केला आहे. प्रस्तुत प्रकरणात वादी व प्रतिवादी यांचा पुरावा संपलेला असून प्रकरण अंतिम युक्तीवादाकरीता प्रलंबित आहे. माझे मा. पूर्वाधिकारी यांनी दिनांक ३०/१/१९८५ रोजी नि. ५१ वर मुद्दे काढले आहेत. मुळ प्रतिवादी क्र. १३ व १४ हे दावा प्रलंबित असताना मयत झाले. त्यानंतर प्रतिवादी क्र. १३ चे वारस म्हणजेच सदर प्रतिवादी क्र. १३अ ते १३फ यांनी दिनांक २७/३/२००३ रोजी सदर दाव्यात हजर होवून आपली कैफियत नि. १४९ वर आपली कैफियत दाखल केली आहे. परंतु सदर कैफियतीला अनुसरुन पुन्हा अतिरिक्त मुद्दे काढण्यात आले नाहीत. प्रतिवादी क्र. १३अ ते १३फ यांनी प्रस्तुत अर्ज सादर करुन मुद्दयांबाबत फेरविचार करण्याची विनंती केली आहे. प्रतिवादी क्र. १३अ ते १३फ यांनी दाखल केलेल्या कैफियतीमध्ये नमुद केलेल्या प्रतिपादनास अनुसरुन दाव्यात अतिरिक्त मुद्दे काढणे आवश्यक आहेत. सबब, खालील आदेश पारित करण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

०१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

०२. सदर अर्जाचा खर्च प्रतिवादीने सोसावयाचा आहे.

JAHEDA MOHMED MISTRY
Digitally signed by JAHEDA MOHMED MISTRY
Date: 2025.07.07 17:34:38 +0530

सावंतवाडी .
दिनांक ०७/०७/२०२५.

(जा.म.मिस्त्री )
दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
सावंतवाडी